लोकसत्ता पृ.पा.३.

लोकसत्ता पृ. पा.१.

# अपघात कमी करण्यासाठी आराखडा तयार करा

## पोलीस आयुक्तांच्या वाहतूक विभागाला सूचना

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** वसई-विरार व मीरा-भाईंदर शहरात विविध ठिकाणच्या रस्त्यांवर अपघाताच्या घटना घडत आहेत. रस्ते अपघतांचे प्रमाण कमी करण्यासाठी रस्ते सुरक्षा जनजागृतीसोबतच एक नियोजित आराखडा तयार करा, अशा सूचना पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय यांनी वाहतूक विभागाला दिल्या आहेत.

वसई-विरार मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय अंतर्गत वाहतूक विभागातर्फे ११ ते १७ जानेवारीदरम्यान रस्ते सुरक्षा अभियान पार पाडले. त्याचा सांगता समारंभ मंगळवारी वसईतील आनंदनगर येथील विश्वकर्मा सभागृहात पार पडला. या वेळी पोलीस आयुक्त पाण्डेय, पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, सुहास बावचे, सहायक पोलीस आयुक्त पंकजा बडे, कैलाश चव्हाण, वसई धर्मप्रांताचे आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो, माजी उपमहापौर प्रकाश रोड्रिक्स आदी उपस्थित होते.



मधुकर पाण्डेय

या अभियानाचा मूळ उद्देश वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे व रस्ते अपघात कमी करण्यासाठी प्रयत्न करणे हा आहे. रस्ते अपघातात वाहनचालकांचे मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. ते कमी होण्यासाठी नागरिकांनी वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे गरजेचे असल्याचे पाण्डेय यांनी सांगितले.

मुंबईसह इतर ठिकाणी पुलांवर धोकादायक वळणांच्या ठिकाणी टायर लावले आहेत, जेणेकरून एखादा अपघात घडल्यास प्रवासी सुरक्षित राहू शकेल. अशा प्रकारच्या काही उपाययोजना वसई-विरार शहरातील धोकादायक वळणांच्या ठिकाणी करता येतील का? याशिवाय ज्या-ज्या भागांत जास्त अपघात होत आहेत, ते कसे रोखता येतील, याच अनुषंगाने वसई-विरार व मीरा-भाईंदर आयुक्तालयातील तिन्ही वाहतूक विभागाने आराखडा तयार करून, त्यानुसार उपाययोजना कराव्यात, अशा सूचना पाण्डेय यांनी वाहतूक विभागाला दिल्या आहेत.

रस्ते सुरक्षा अभियानाच्या निमित्ताने वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जनजागृती, सूचना फलक लावणे, पथनाट्य, चित्रफीत तयार करणे, असे विविध उपक्रम राबवण्यात आल्याची माहिती वाहतूक पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी दिली.

वाहतूक नियंत्रणादरम्यान सर्वोत्तम कामगिरी करणारे वाहतूक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# विरार पोलिसांचा नागरिकांशी थेट संवाद

**वसई:** नागरिकांच्या अडचणी समजून घेण्यासाठी सोसायटी, चाळी, नागरीवस्ती अशा ठिकाणी बैठका घेऊन संवाद साधण्याचा उपक्रम विरार पोलिसांकडून राबविला जाणार आहे. याबाबत वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी प्रत्येक बीट चौकीतील पोलीस कर्मचाऱ्यांना आदेश दिले आहेत.

विरार पोलीस ठाण्याच्या अंतर्गत विरार पूर्वेसह ३१ किलोमीटरचा परिसर आहे. या पोलीस ठाण्याच्या हद्दीत झपाट्याने नागरिकरण वाढत आहे. यामुळे ठाण्याअंतर्गत होणाऱ्या गुन्ह्यांच्या घटनांवर लक्ष, कायदा सुव्यवस्था अशा सर्व गोष्टी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. तसेच पोलीस आणि जनता यामध्ये आपुलकीची भावना निर्माण व्हावी व त्यांच्या अडचणी व घडणाऱ्या घडामोडी यावर लक्ष ठेवणे अधिक सुलभ जावे यासाठी थेट जनतेशी संपर्क साधण्यास सुरुवात केली जाणार

आहे. यामध्ये विरार पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येणाऱ्या सोसायट्या, चाळी, नागरी वस्ती अशा ठिकाणी जाऊन नागरिकांच्या बैठका घेऊन संवाद साधला जाणार आहे. तेथील अडचणी, सुरक्षाव्यवस्था, अनोळखी व्यक्तीचा वावर, सीसीटीव्हीची गरज, भाडेकरूंच्या नोंदी अशा विविध विषयांवर संवाद साधला जाणार आहे. नागरिकांचे पोलिसांना चांगले सहकार्य मिळाले तर परिसरातील गुन्हेगारी व इतर समस्या सुटण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास राजेंद्र कांबळे यांनी व्यक्त केला आहे.

CamScanner
CamScanner

लोकसत्ता ५.५.२.

# प्रभारी सहायक आयुक्तांची बदली

## वसई पालिकेत मनसेचे आंदोलन

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या 'एच' प्रभागातील मनसेचे झेंडे काढून टाकण्यात आल्याने तसेच पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी मनसेच्या विरोधात काळ्या फिती बांधून आंदोलन केल्याप्रकरणी मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले. मनसे कार्यकर्त्यांनी गुरुवारी आयुक्तांच्या दालनासमोर प्रभारी सहायक आयुक्त गिल्सन घोन्सालवीस यांच्याविरोधात पाच तास ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनानंतर घोन्सालवीस यांची बदली करण्यात आली.

वसईच्या 'एच' प्रभागात मनसेच्या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी विविध ठिकाणी पक्षाचे झेंडे लावण्यात आले होते. हे झेंडे परवानगी न घेता लावल्याने घोन्सालवीस यांच्या सूचनेनुसार कर्मचाऱ्यांनी ते काढून टाकले होते. त्यावरून मनसे कार्यकर्ते आणि पालिकेचे कर्मचारी यांच्यात वाद झाला होता. त्याच्या निषेधार्थ पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती बांधून मनसेविरोधात आंदोलन केले होते.

या प्रकरणानंतर मनसे कार्यकर्ते आणि घोन्सालवीस यांच्यातील वाद आणखी चिघळला. गुरुवारी सकाळी मनसे नेते अविनाश जाधव यांनी कार्यकर्त्यांसह आयुक्तांच्या दालनासमोरच बसून घोन्सालवीस यांच्याविरोधात ठिय्या आंदोलन केले. घोन्सालवीस यांनी केवळ मनसेचे झेंडे काढले व इतर पक्षांचे झेंडे तसेच ठेवले, अशी एकतर्फी कारवाई का केली, असा प्रश्न जाधव यांनी उपस्थित केला. इतर पक्षांचे झेंडे व पाचशेहून अधिक बेकायदा फलक अजूनही तसेच आहेत. त्यावर कोणतीच कारवाई केली जात नाही, याकडे जाधव यांनी लक्ष वेधले.

घोन्सालवीस यांनी जाणूनबुजून हे सर्व कृत्य केले असून, त्यांना निलंबित करावे, अशी मागणी मनसेने केली. जोपर्यंत त्यांचे निलंबन होणार नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा पवित्रा मनसेने घेतला होता.

पाच तास झालेल्या आंदोलनानंतर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी घोन्सालवीस यांची मुख्यालयात बदली केली आहे. पुढील आदेश मिळेपर्यंत मुख्यालयात हजर व्हावे. त्यांच्या प्रभागाच्या संदर्भातील अतिरिक्त कार्यभाराचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील, असे आदेश घोन्सालवीस यांना अतिरिक्त आयुक्तांनी दिले आहेत. दरम्यान, घोन्सालवीस यांच्या बदलीच्या आदेशानंतर मनसेच्या कार्यकर्त्यांनी आपले आंदोलन मागे घेतले.

लोकसत्ता ५.५.१९.

# सुशोभीकरणाच्या नावाखाली झाडांची कत्तल

## नंदाखाल येथील प्रकार

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** विरार पश्चिमेच्या नंदाखाल येथे तलावाच्या सुशोभीकरणाच्या नावाखाली झाडांची कत्तल केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकाराबाबत पर्यावरणप्रेमी नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.



**"झाडांच्या संदर्भात माहिती व तक्रार मिळाली आहे. पुढील कार्यवाहीसाठी ती तक्रार वृक्ष प्राधिकरण विभागाकडे पाठविण्यात आली आहे.** - प्रकाश जाधव, साहाय्यक आयुक्त ए प्रभाग समिती

विरार पश्चिमेच्या नंदाखाल येथे चर्चजवळ प्राचीनकालीन तलाव आहे. या तलावाचे पालिकेकडून सुशोभीकरण करण्यात आले होते. सद्य:स्थितीत या तलावाची अवस्था बिकट झाल्याने येथील तलावाचे पुन्हा एकदा पालिकेने नूतनीकरण करण्याचे काम सुरू केले आहे. परंतु या तलावाचे सुशोभीकरण करीत असताना तलावाच्या लगतच असलेल्या झाडांची कत्तल केली जात असल्याचा प्रकार घडला आहे. सुशोभीकरण करीत असताना झाडांचा अडथळा नसताना ही कत्तल केली जात असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे. जवळपास आतापर्यंत येथील सात ते आठ झाडे तोडण्यात आली आहेत. जर झाडांचा सुशोभीकरणात अडथळा येत होता तर त्याची छाटणी करण्याऐवजी चक्क मुळापासून ही झाडे तोडली जात असल्याचे आम आदमी पार्टीचे जॉन परेरा यांनी सांगितले आहे. यावर पालिकेने लक्ष देऊन संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी परेरा यांनी केली आहे.

आधीच विविध मार्गाने वसई विरार परिसर धोक्यात येत असताना झाडांची कत्तल करून पर्यावरणास हानी पोहोचविली जात आहे असेही परेरा यांनी सांगितले आहे.

CamScanner
CamScanner

लोकसत्ता पृ-५ ता.१.

# सुशोभीकरणाचा कचरा


## शहरात अतिकचऱ्याच्या ठिकाणांचे सौंदर्यीकरणानंतरही कचरा टाकण्याचे प्रकार

लोकसत्ता वार्ताहर

**वसई:** शहर स्वच्छ व सुंदर राहावे यासाठी वसई-विरार महापालिकेने अतिकचऱ्याच्या ठिकाणांचे सौंदर्यीकरण केले आहे. मात्र या सौंदर्यीकरणानंतरही काही ठिकाणी कचरा आणून टाकण्याचे प्रकार सुरूच आहेत.

वसई, विरार शहरातील काही ठिकाणी सातत्याने कचरा टाकला जात होता. या कचऱ्यामुळे आजूबाजूचा परिसर हा दुर्गंधीयुक्त होत होता. यामुळे नागरिकांचे आरोग्यही धोक्यात येण्याची शक्यता आहे. तसेच या वाढत्या कचाऱ्याच्या ढिगाऱ्यामुळे शहराचे विद्रूपीकरण होत होते. यासाठी पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने अशा ठिकाणांचे सर्वेक्षण केले होते. ज्या ठिकाणी जास्त कचरा टाकला जातो व सातत्याने तो परिसर कचऱ्याने वेढलेला असतो.

अशा परिसराची स्वच्छता अबाधित राहावी व नागरिकांना मोकळा श्वास घेता यावा या उद्देशाने पालिकेने ठिकाणांचे सौंदर्यीकरण केले आहे. यात विविध प्रकारची आकर्षक शिल्पे तयार करून त्यात रोषणाई केली आहे. परंतु काही ठिकाणच्या भागात सौंदर्यीकरण केलेल्या ठिकाणांच्या समोरच कचरा आणून टाकण्याचे प्रकार सुरूच असल्याचे चित्र दिसून येत आहे. नालासोपारा येथील मोरगाव ते नालेश्वर येथील रस्त्यावरील हनुमान नगर, सीताराम बेकरी, नाळेश्वर नगर अशा ठिकाणी असलेल्या शिल्पासमोर कचरा टाकला जात आहे. सौंदर्यीकरण केल्यानंतर तरी शहर स्वच्छ राहील असे वाटले होते मात्र तरीही कचरा टाकणे सुरूच असल्याने शहराचे विद्रूपीकरण सुरूच राहिले आहे.







### नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

वसई विरार शहर स्वच्छ व सुंदर राहावे यासाठी पालिकेने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. कचरा कचरा कुंडीत टाकावा यासाठी कचराकुंड्या वाटप, कचरा उघड्यावर टाकू नये व ज्या ठिकाणी सातत्याने कचरा होता ती स्वच्छ करून त्या भागात सुशोभित शिल्प उभारणी करण्यात येत आहे. हे सर्व नागरिकांच्या व शहराच्या हिताचे आहे त्यामुळे नागरिकांनीही सहकार्य करावे व अशा ठिकाणी कचरा न टाकता तो कचरा कचराकुंडीमध्ये टाकावा, असे आवाहन वसई विरार महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून करण्यात येत आहे.

CamScanner
CamScanner

लोकसत्ता पु.पा. १.

# रखडलेल्या न्यायालयाचे काम तीन वर्षांनंतर सुरू

**लोकसत्ता वार्ताहर**



**भाईंदर :** मीरा भाईंदर शहरातील फौजदारी व दिवाणी न्यायालयाचे अर्धवट राहिलेले काम अखेर तीन वर्षानंतर पुन्हा सुरू झाले आहे. यामुळे येत्या काही महिन्यांतच येथे न्यायालयीन कामकाज पार पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मीरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मीरारोड येथे राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने फौजदारी व दिवाणी न्यायालयाची इमारत उभारली आहे. या इमारतीमधील आवश्यक फर्निचर व विद्युतविषयक आदी सर्व प्रकारची कामे करण्यासाठी किमान साडेनऊ कोटी रुपयांची आवश्यकता होती. यासाठी विधि व न्याय विभागाने पाठपुरावा केल्यानंतर यंदाच्या अर्थसंकल्पात राज्य शासनाकडून निधीची तरतूद करण्यात आली होती, परंतु तरी देखील प्रत्यक्षात कामास सुरुवात होत नसल्याचे दिसून येत होते.

त्यामुळे दोन महिन्यांपूर्वी शहरातील स्थानिक वकिलांकडून आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेत रखडलेले कामकाज त्वरित पूर्ण करण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आले होते. त्यानुसार न्यायालयाच्या इमारतीमध्ये कंत्राटदाराकडून नुकतीच सुरुवात करण्यात आली असून प्रथमच अंतर्गत जागा समांतर करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

मीरा भाईंदर शहराची लोकसंख्या सुमारे १५ लाख असून येथील नागरिक, पोलीस, वकील, व्यावसायिक, अधिकारी व कर्मचारी वर्गास न्यायालयीन कामकाजासाठी ठाण्याला जावे लागत आहे. यात भरपूर वेळ आणि पैसा वाया जात आहे. त्यामुळे न्यायालय लवकर सुरू झाले तर नागरिकांसह सर्वांनाच मोठा दिलासा मिळेल.

लोकसत्ता पु.पा. ३.

# वसई, विरारमध्ये ई सिगारेटची सर्रास विक्री

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** वसई, विरारमध्ये सध्या पेन हुक्का ई सिगारेटचे फॅड वाढत असताना दिसत आहे. काही वर्षांपूर्वी काही ठरावीक ठिकाणी मिळणाऱ्या या ई सिगारेट आता सर्रास अनेक ठिकाणी सहज उपलब्ध होत आहेत. तरुण वर्गात या सिगारेटचा मोठा वापर केला जात आहे. बंदी असतानाही वसई विरारमध्ये खुलेआम या सिगारेट विकल्या जात आहेत.

तरुणाईमध्ये व्यसनाचे प्रकार वाढीस लागू नयेत यासाठी शासनाकडून गुटखाबंदी आणली आहे. तर सिगारेट आणि तंबाखू याच्यावर आरोग्यास हानीकारक असल्याचे संदेश दिले जातात. त्याचबरोबर सिगारेटचे दरसुद्धा वाढविण्यात आले आहेत. यांमुळे व्यसन करणाऱ्यांना आपल्या सवयीसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक भार सहन करावा लागतो. पण त्याला आता ई सिगारेटच्या नावाखाली पर्याय उभा राहत असून त्याची लोकप्रियता वाढत चालली आहे. किमतीने स्वस्त आणि सहज उपलब्ध होणारा व कुणाच्या नजरेत न येणारा हा व्यसनाचा प्रकार मोठ्या झपाट्याने लोक वापरत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार दोन ते तीन वर्षांपूर्वी या पेन हुक्क्याच्या किमती ५०० ते ९०० रुपयांच्या घरात होत्या. त्यात वापरल्या जाणाऱ्या तंबाखूचे प्रकार महाग होते. करोना टाळेबंदीच्या काळात अनेक दुकाने, पानटपऱ्या बंद असल्याने आणि नागरिकांना घरातच राहावे लागत असल्याने या ई सिगारेटची मागणी वाढत गेली. सध्या बाजारात एका वापरापासून वारंवार वापरल्या जाणाऱ्या ई सिगारेट उपलब्ध आहेत. त्यांच्या किमती ६० रुपयांपासून ३०० रुपयांपर्यंत आल्या आहेत. या ई सिगारेट ऑनलाइनसुद्धा सहज उपलब्ध होतात. या हुक्क्याची मागणी पाहता कॉलेज, शाळांजवळील छोटी मोबाइल दुकाने, पानपट्टी तसेच काही किराणा दुकानांत, गिफ्ट वस्तूंच्या दुकानात सर्रास विक्री केली जात आहे.

## ई सिगारेट काय?

अनेक ठिकाणी हुक्काबंदीनंतर हुक्क्याचे हे नवे रूप आहे. साधारणतः पेनसारखा दिसणारा हा हुक्का पूर्णतः बॅटरीवर चालणारा आहे. मोबाइलप्रमाणे चार्ज करून उपयोगात आणला जातो. हुक्क्याचे फ्लेवर कार्ट्रेजमध्ये भरून ओढले जातात. यात तंबाखूयुक्त द्रव आणि फ्लेवरयुक्त साधे द्रव भरले जाते.

**"याबाबत अमली पदार्थविरोधी पथकाच्या साहाय्याने सतत कारवाई सुरू आहे. ई सिगारेट विक्रीवर बंदी आहे. आम्ही या संदर्भात माहिती घेत आहोत. असे काही आढळून आल्यास आम्ही कडक कारवाई करू.**

–अमर मराठे, पोलीस निरीक्षक, अमली पदार्थविरोधी पथक

CamScanner
CamScanner

म.टा. पु.पा. १.

# प्रदूषणकारक कारखाने मोकाट

## वसई-विरारमध्ये सहा महिन्यांत केवळ ११ कारखान्यांवर कारवाई

वैष्णवी राऊत, वसई

वसई-विरार शहरातील प्रदूषण रोखण्यात वसई-विरार महापालिका अपयशी ठरल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेवर आधीच दंडात्मक कारवाई केली आहे. उघड्यावर सांडपाणी सोडणाऱ्या आणि जलप्रदूषणास कारणीभूत ठरलेल्या वसईतील औद्योगिक कारखान्यांवरही प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाईचा बडगा उगारला असून, मागील सहा महिन्यांत ११ कारखान्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मात्र वसईच्या औद्योगिक वसाहतीत हजारो लहानमोठे कारखाने असून, यापैकी बहुतांश कारखाने अनधिकृत आहेत, तसेच त्यांच्याकडून नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे आरोप आहेत. त्यामुळे प्रदूषण मंडळाने सर्वेक्षण करून इतर प्रदूषणकारी कारखान्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

वसई पूर्वेला वसई तालुक्यातील सर्वांत मोठी औद्योगिक वसाहत आहे. येथील सातिवली, वालीव, गोखिवरे, नवघर, भोईदापाडा, चिंचपाडा, गोलानी मार्ग, वसई फाटा या भागात अडीच हजार लघू आणि मध्यम उद्योग आहे. अनेक नामांकित कंपन्या या भागात आहेत. वसई पूर्वेकडील औद्योगिक वसाहत स्थापन झाल्यावर येथे कारखान्यांचे मोठे जाळे पसरले आहे. या कारखान्यांना सर्वच विभागांकडून सरकारी परवानग्या देताना, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्याचे नमूद करण्यात आले होते. परंतु, असे असतानाही आजही कारखान्यांचे सांडपाणी उघड्यावरच सोडले जात असल्याने नैसर्गिक नाले सांडपाण्याने वाहताना दिसतात. अशा रीतीने सांडपाणी उघड्यावर सोडणाऱ्या कारखान्यांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) कारवाई करते. मात्र तरीही सांडपाणी सोडण्याचे सत्र सुरूच असते.

विविध कारखान्यांमधील सांडपाणी उघड्यावर सोडण्यात येत असल्याच्या तक्रारी प्रदूषण मंडळाकडे आल्या होत्या. त्यामुळे या तक्रारींवरून अशा कारखान्यांवर कारवाई करण्यात आली आहे. प्रदूषणास कारणीभूत ठरत असल्याने अशा एकूण ११ कारखान्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. तसेच, पुढे या प्रकारचे प्रदूषण होऊ नये म्हणून प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या त्रुटी दूर कराव्यात, अशा नोटिसादेखील बजावण्यात आल्या आहेत. मात्र अडीच हजार तक्रारींपैकी केवळ ११ कारखान्यांवर कारवाई करण्यात आली आहे. वसईत अनेक कंपन्या रस्त्यावर सांडपाणी सोडत असल्याचे नागरिकांनी सांगितले. मात्र त्यांच्यावर कारवाई झालेली नाही. त्यामुळे तक्रारी प्राप्त न झालेल्या, तसेच निदर्शनास न येणाऱ्या, मात्र तरीही प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या कंपन्यांचे सर्वेक्षण करून त्यांच्यावरदेखील प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### पर्यावरणप्रेमींकडून संताप

औद्योगिक वसाहतीमध्ये सांडपाणी वाहून जाण्याची योग्य व्यवस्था नाही. त्यामुळे कारखान्यांमधील सांडपाणी नैसर्गिक नाल्यांमध्ये बाराही महिने वाहताना दिसते. वसईतील औद्योगिक वसाहतीमधून तेलयुक्त पाणी उघड्यावर सोडण्याचे प्रकार नेहमीच घडतात. हे पाणी गटारांमधून नाल्याला आणि पुढे नद्या, खाड्यांना जाऊन मिळते. यामुळेच वसईतील अनेक खाड्या प्रदूषित झाल्या आहेत. त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी संताप व्यक्त केला आहे. या कारखान्यांनी हे सांडपाणी प्रक्रिया करूनच बाहेर सोडावे, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.



प्रातिनिधिक छायाचित्र


> प्रदूषणास कारणीभूत ठरलेल्या कंपन्यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे अशा कारखान्यांवर कारवाई करून, त्यांना सुधारणा करण्याची नोटीस देण्यात येते. त्यांनी तरीही कार्यवाही केली नाही, तर कारखाने बंद करण्याची नोटीस बजावली जाते. त्यांचे परवाने जप्त केले जातात. मागील सहा महिन्यात अशा एकूण ११ कारखान्यांवर कारवाई करण्यात आली आहे.
>
> - सतीश पडवाल,
> प्रदूषण नियंत्रण मंडळ, वसई-ठाणे

सकाळ ५.१.३.

# चंद्रपाड्याला पाणीटंचाईची झळ?

## पाझर तलावाची पातळी घटली; अवघा ५० टक्के साठा शिल्लक

विरार, ता. १९ (बातमीदार) : नायगाव पूर्व जूचंद्र गाव परिसरातील पाड्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या पाझर तलावाच्या पाण्याचा उपसा वाढल्याने पाझर तलावाच्या पाण्याच्या पातळीत जानेवारी महिन्यातच प्रचंड घट झाली आहे. यामुळे चंद्रपाडा ग्रामपंचायत परिसरात मार्च, एप्रिल महिन्यातच तीव्र पाणीटंचाईची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या या पाझर तलावामध्ये ५० टक्के पाणी शिल्लक राहिले आहे.



विरार : चंद्रपाडा पाझर तलावाची पातळी घटली असून त्यात ५० टक्के इतका साठा शिल्लक आहे.

चंद्रपाडा परिसराला या पाझर तलावातून पाणीपुरवठा केला जातो; पण या तलावाची पाणीपातळी खालावल्याने त्याचा फटका येथील पाणीपुरवठ्यावर होणार आहे; तर दुसऱ्या बाजूला जूचंद्र गावाला सूर्या पाणीपुरवठा योजनेतून पाणी मिळत असल्याने त्यांना पाझर तलावाचे पाणी देणे काही दिवस बंद केल्यास आम्हाला मे महिन्यापर्यंत पाणी पुरू शकेल.

- शुभांगी वेंद्रे, पंचायत समिती सदस्य

पूर्वी जूचंद्र ग्रामपंचायत हद्दीत आताची चंद्रपाडा ग्रामपंचायत, वाकी पाडा, खोपरे पाडा, सुकाळपाडा हे पाडे समाविष्ट होते. त्या वेळी भेडसावणाऱ्या तीव्र पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पाझर तलावाची निर्मिती करण्यात आली. मात्र १९९२ च्या सुमारास चंद्रपाडा परिसरात लोकवस्ती वाढल्याने या पाड्यांची स्वतंत्र ग्रामपंचायत अस्तित्वात आली. आता जूचंद्र ग्रामपंचायतीचा वसई-विरार महापालिकेत समावेश झाला आहे; तर चंद्रपाडा स्वतंत्र ग्रामपंचायत आहे. त्यामुळे जूचंद्र गावाला महापालिका सूर्या धरणाचे पाणी पुरवत आहे. या शिवाय पाझर तलावाच्या पाण्याचा पुरवठा सकाळी ६ वाजल्यापासून रात्री ११ वाजेपर्यंत सुरू असल्याचे सांगितले जात आहे; पण सध्या पाझर तलाव परिसरात मोठ्या प्रमाणात बोअरवेलद्वारे मोठ्या प्रमाणात पाणीउपसा होत आहे. त्यामुळे तलावाची पाणीपातळी कमी होत आहे. हा प्रकार असाच सुरू राहिल्यास चंद्रपाडा व इतर पाड्यांना मार्च, एप्रिल महिन्यातच पाणीटंचाई भेडसावण्याची शक्यता आहेत. त्यामुळे महापालिकेने पाझर तलावाचा पाणीउपसा कमी करावा, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

## नागरीकांच्या तक्रारींची पोलीसांत दखल

**विरार :** वसई-विरार व मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील नागरीकांच्या कायदा सुव्यवस्था विषयक तक्रारींचे निराकरण आता शहरातील व गावातील पोलीस ठाण्यात होणार आहे. यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात दर शनिवारी नागरीकांच्या तक्रारी ऐकल्या जाणार आहेत. पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी तशा सूचना दिल्या आहेत. पोलीस निरीक्षकांनी व संबंधित विभागाच्या अधिकार्यांनी शनिवारी पोलीस स्थानकात थांबून तक्रारदार नागरीकांचे म्हणणे समजून घ्यावे व तक्रारीवर उपाययोजना करावी, अशा सूचना पोलीस आयुक्त मधुकर पाण्डेय यांनी दिल्या आहेत. पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील वसई, माणिकपूर, वालीव, विरार, तुळींज, आचोळे, नालासोपारा, अर्नाळा, पेल्हार, मांडवी, नवघर भाईंदर, नयानगर, काशिमीरा, मिरारोड कनकीया, उत्तन अशा सर्वच पोलीस ठाण्यात आठवड्यातील प्रत्येक शनिवारी सर्व सामान्य नागरीकांच्या तक्रारींचे निवारण केले जाणार आहे.

← पुढारी पा.नं.४.

## क्रिकेट ग्राऊंडवर बिल्डरचा कब्जा

**विरार :** आगाशी येथील पुरापाडा क्रिकेट ग्राऊंडवर आता बिल्डरने अधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. पुरापाडा गावातील जुन्या जमीन मालकीच्या कागदपत्राआधारे महापालिकेतून या ग्राऊंडवर इमारत बांधकामासाठी परवानगी मागण्यात आली आहे. पालिकेने ही परवानगी देण्याची तयारी केल्याचे समजते. या प्रकरणी ग्रामस्थांनी पूर्वापार ग्रामस्थांना हे ग्राऊंड क्रिकेट व इतर खेळासाठी राखीव असून आता या जागेवर थातूर-मातूर पुरावा घेऊन बिल्डर कब्जा करु पाहत आहेत. या बाबत ग्रामस्थांनी आ. हितेंद्र ठाकूर यांची भेट घेऊन ग्रामस्थांच्या क्रीडा व इतर कार्यामासाठी गेल्या अनेक दशकात हे ग्राऊंड गावकरी वापरतात. तेव्हा नव्या कायद्याचा फायदा घेऊन बिल्डर येथे बांधकाम करु पाहत आहेत. ते रोखावे अशी आमदारांकडे मागणी करण्यात आली. आपण या प्रकरणी संबंधितांना बोलावून वस्तुस्थिती जाणून घेऊ असे आमदार ठाकूरांनी यावेळी आगाशीतील जमलेल्या ग्रामस्थांना सांगितले.

CamScanner
CamScanner

पुण्यनगरी ९.५.१४.

# पेणकरपाडा गावठाण करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांची बैठक



। मीरा रोड : मीरा-भाईंदर शहरातील पूर्वीच्या अनेक जुन्या गावांमध्ये गावठाण घोषित करण्यात आलेले नाही. त्यामुळे या जमिनी गावातील स्थानिक रहिवाशांच्या नावावर नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून भूमापन विभागाकडून मालकी सनद देण्याची कार्यवाही रखडलेली आहे. त्यामुळे पिढ्यानंपिढ्या त्या जमिनीवर राहणाऱ्या ग्रामस्थांना घर दुरुस्तीसाठी व इतर अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यामुळे मीरा-भाईंदर शहरात गावठाण घोषित करून जमिनी नावावर करून देण्यासाठी मीरा रोड पूर्वेच्या पेणकरपाडा येथे गावठाण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी स्थानिक नेत्यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

मीरा-भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात १९ गावे आहेत. या गावांत स्थानिक रहिवाशी अनेक पिढ्यांपासून राहत आहेत. या गावातील अनेक भागात गावठाण घोषित झाले नसल्यामुळे त्यांच्या घराच्या जमिनी या नावावर नाहीत. यापूर्वी गावठाण घोषित करून नागरिकांना मालकी सनद देण्यासाठी २००८ साली काही गावांचे खाजगी संस्थेकडून सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यानंतर नगर भूमापन विभागाकडून त्याची पडताळणी करण्यात आली नसल्यामुळे ही कार्यवाही गेल्या अनेक वर्षांपासून रखडली आहे. त्यामुळे या जागेवर राहणाऱ्या ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. यामध्ये प्रामुख्याने घर दुरुस्ती करणे, घरावर कर्ज मंजूर करणे किंवा इतर कागदपत्र नावावर करणे अशी कामे करण्यास अडथळे येत आहेत. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या या कार्यवाहीला गती देण्यासाठी मोहीम राबवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्याची सुरुवात मीरा रोडच्या पेणकर पाडा गावातील प्रेमा लक्ष्मण शाळेत गावठाण परिषद आयोजित करून करण्यात आली आहे. या वेळी परिषदेत गावठाण करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कार्यवाहीसंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच ग्रामस्थांचे असलेले प्रश्न व त्यांच्या समस्यांचे निवारणदेखील करण्यात आले. या वेळी ग्रामस्थांना प्रमुख मार्गदर्शन शेतकरी प्रबोधिनीचे अध्यक्ष राजाराम पाटील यांनी केले. या वेळी जमीन नावावर करण्यासाठी तसेच अधिकृत गावठाण घोषित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम उभारण्याचा निर्णयदेखील घेण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या परिषदेला परिसरातील स्थानिक नेत्यांसह ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

पुण्यनगरी ९.५.१४.

# चोरट्यांना नागरिकांनी बदडले

## नालासोपारा येथील नाळा गावातील प्रकार

। नालासोपारा : नालासोपारा पश्चिमेकडील नाळा गावातील एका बंद बंगल्यात चोरी करण्यासाठी घुसलेल्या चोरट्यांना नागरिकांनी पकडून बदडले. संतप्त जमावाने चोरट्यांच्या रिक्षाचीही तोडफोड केली असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून नालासोपारा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीवर वेळीच नियंत्रण मिळवले.

नालासोपारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत नाळा गावातील पद्मश्री भाऊसाहेब वर्तक विद्यामंदिराजवळ रानभाट रोड येथे मुख्य रस्त्यावर गॅब्रियल कोरिया यांचा बंगला आहे. गॅब्रियल कोरिया हे बोरिवलीत राहात असल्यामुळे त्यांचा बंगला सध्या बंद आहे. चोरट्यांनी या बंद घराची रेकी करून दोन दिवसांपूर्वी त्यांच्या घरातील दोन सिलिंडर, इन्व्हर्टर व बॅटरी, एसी युनिट व मुलांच्या पिगी बॅंगेतील पैसे असा मुद्देमाल चोरून नेला होता. याची तक्रार नालासोपारा पोलीस ठाण्यात गॅब्रियल कोरिया यांनी दिली होती. बुधवारी रात्री आठच्या सुमारास पुन्हा पाच चोरटे बंगल्यातील इतर सामान चोरण्यासाठी रिक्षा घेऊन आले होते. तीन चोरट्यांनी बंगल्याच्या टेरेसवरील इन्व्हर्टर व बॅटरी चोरण्याचा प्रयत्न केला असता परिसरातील नागरिकांना याची चाहूल लागली. त्यातील दोन चोरट्यांना पकडण्यात नागरिकांना यश आले तर उर्वरित तीन जण पळून गेले. संतप्त नागरिकांनी त्यानंतर पकडलेल्या चोरट्यांपैकी एकाची यथेच्छ धुलाई केली. यात दुसरा पकडलेला आरोपी अल्पवयीन असून चोरी करणारे सर्वजण नालासोपारा टाकी रोड येथील असल्याची माहिती समोर आली. संतप्त जमावाने त्यानंतर चोरट्यांनी आणलेल्या रिक्षाचीही तोडफोड केली.



नालासोपारा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. मात्र पोलिसांनी आरोपीला नेण्यासाठी खासगी वाहन आणले असल्यामुळे नागरिकांच्या संतापाचा उद्रेक झाला. अखेर नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी अधिक पोलीस बळ सोबत घेत घटनास्थळी धाव घेतली व परिस्थितीवर वेळीच नियंत्रण मिळवले. याबाबत नालासोपारा पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले असून पुढील तपास नालासोपारा पोलीस करत आहेत.

CamScanner
CamScanner

लोकमत

न्यूज Inbox

# गटारावरील झाकण चोरी करताना पकडले

नालासोपारा : गटारावर बसवलेल्या झाकणाची चोरी करताना आरोपींना पकडल्याची घटना नालासोपाऱ्यात घडली आहे. प्रगतीनगर येथील मंगलमूर्ती बिल्डिंगजवळील गटारावर वसई-विरार महापालिकेने बसवलेली २३ हजार ३०० रुपये किमतीची लोखंडी झाकणे बुधवारी संध्याकाळी अनिल मौर्या व सोहेल अन्सारी हे दोघे काढून घेऊन जात असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. बुधवारी तुळींज पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Jan 20, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

CS CamScanner

लोकमत

# पोलिस शिपाई पदासाठी वकील, डॉक्टर अन्‌ इंजिनीअरची धाव!

## वाढत्या बेरोजगारीमुळे तरुण पोलिस भरतीत आजमावत आहेत नशीब

मंगेश कराळे

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : देशात बेरोजगार तरुणांची संख्या मोठी आहे. अनेक तरुण हे उच्चशिक्षित असूनही ते बेकार आहेत. रोजगार मिळत नसल्याने मिळेल ते काम करण्यास तरुण वर्ग तयारीत आहे. सध्या राज्यात मोठ्या प्रमाणात पोलिस भरती सुरू असून या भरतीत इंजिनिअर, डॉक्टर, एमबीए, एमएस्सी झालेले तरुणही आपले नशीब आजमावत आहेत. बीटेक, बीई याचबरोबर एमबीए केलेलेही शेकडो तरुण या भरतीत दिसून येतात.

भरती प्रक्रियेत सहभागी उच्चशिक्षितांचे प्रमाण मोठे असल्याने पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. पोलिस आयुक्त मधुकर पांडेय, अतिरिक्त पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो अधिकारी-अंमलदारांच्या बंदोबस्तात भरती प्रक्रिया सुरू आहे. राज्य सरकारने भरती प्रक्रियेला हिरवा कंदील दाखवल्यानंतर मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयात शिपाई पदाच्या १८६, तर शिपाई वाहनचालक पदाच्या दहा अशा एकूण १९६ पदांसाठी नोव्हेंबरमध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

### पदे १९६, अर्ज ७४,४५८

मीरा, भाईंदर, वसई, विरार पोलिस आयुक्तालयातील प्रथम भरती प्रक्रियेला २ जानेवारीपासून मैदानी चाचणीला सुरुवात झाली आहे. शिपाई आणि वाहनचालक पदाच्या १९६ जागांसाठी भरती होणार असून त्यासाठी ७४ हजार ४५८ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले आहेत.



### महिलांच्या २९४ जागांसाठी ११ हजार ७८७ अर्ज

पोलिस आयुक्तालयात पोलिस भर्ती सुरू असून महिला पोलिसांसाठी २९ जागांवर भरती आहे. त्यासाठी ११ हजार ७८७ अर्ज आले आहेत. यामध्ये ३ महिलांसाठी चालक म्हणून जागा उपलब्ध आहे.

### अर्जदार उच्चशिक्षित किती?

| शिक्षण | अर्जदार | शिक्षण | अर्जदार |
|---|---|---|---|
| बी.टेक | १४१ | बी.कॉम | ४,४७३ |
| एम.ई. | ४ | एम. कॉम | ५२१ |
| बी.ई. | ३७१ | एम.एससी | २७१ |
| एमबीए | ४५ | बी.एससी | ३,९५२ |
| बीबीए | ८१ | एलएलबी | १० |
| बी. फार्मसी | ५० | एमए | १,७३७ |
| | | बीए | १४,८४३ |

### यांच्यासाठीही जागा आहेत आरक्षित

खुल्या वर्गासाठी २७९ तर अनुसूचित जाती जमाती विशेष मागासवर्ग आणि इतर मागासवर्गासाठी ७१७ पदे आहेत. महिलांसाठी ३० टक्के, खेळाडू ५ टक्के, निवृत्त पोलिसांच्या पाल्यासाठी, प्रकल्पग्रस्तांसाठी ३ टक्के, भूकंपग्रस्तांसाठी २ , माजी सैनिकांसाठी १५ आणि होमगार्ड ५ टक्के तसेच अनाथांसाठी १ टक्का जागा आहे.

### भरती प्रक्रिया वेगाने

- आतापर्यंत शेकडो उमेदवारांची शारीरिक चाचणी पूर्ण झालेली आहे. सध्या दरदिवशी शेकडो उमेदवारांची १६०० मीटर धावणे, गोळाफेक, वजन, उंची मोजणे घेण्यात येत आहे.
- **सध्या भरती प्रक्रियेत शेकडो अधिकारी, कर्मचारी कार्यरत असू ही संख्या पुढील काळात वाढवण्यात येणार आहे.**
- यंदा भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने इन-कॅमेरा होत असल्या पोलिसांनी सांगितले.

### २८ फेब्रुवारीपर्यंत चालणार भरती

पोलिस आयुक्तालयात २ जानेवारीपासून ते २८ फेब्रुवारीपर्यंत भाईंदर पश्चिमेकडील नेताजी सुभाषचंद बोस या मैदानावर ही पोलिस भरती चाचणी घेतली जात आहे. याकरिता तयारी पूर्ण झालेली असून दररोज भर्ती प्रक्रिया सुरू आहे.

Hello Vasai
Page No. 3 Jan 20, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

CamScanner

मीरा-भाईंदर,वसई-विरार पोलिसांचा उपक्रम

# वर्षभरात १५८ बेवारस मृतदेहांवर अंत्यसंस्कार

**भाईंदर:** मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२२ सालात सापडलेल्या १७८ अनोळखी मृतदेहांपैकी १५८ बेवारस मृतदेहांवर पोलिसांनीच अंत्यसंस्कार केले असल्याचे समोर आले आहे. बेवारस मृतदेहांवर महापालिकेच्या स्मशानभूमीत मोफत अंत्यविधी केला जात असला तरी मृतदेहाच्या कफनपासून अन्य साहित्यासाठी लागणारा खर्च पोलीस स्वतःच्या खिशातूनच करत असतात. मृत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करणे हे पुण्याचे कार्य असले तरी याची जबाबदारी घेण्यास कोणीही पुढे येत नाही.

मीरा-भाईंदर व वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अनोळखी मृतदेह आढळून येत असतात. समुद्र वा खाडी किनारी आढळून येण्यासह विविध अनोळखी व्यक्तींच्या मृतदेहांची ओळख पटवण्याचे पोलिसांसमोर आव्हान असते. अनेकवेळा ओळख पटली तरी वारस सापडत

per.freepressjournal.in



## वारस शोधण्यासाठी प्रभावी यंत्रणांची गरज

**काही प्रकरणात पोलिसांकडे बेपत्ता व्यक्तीबाबत सतत पाठपुरावा करून सुद्धा सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही, अशा तक्रारी देखील ऐकू येतात. पोलिसांनी सुद्धा अनोळखी मृतदेहांची ओळख पटवण्यापासून त्यांचे वारस शोधण्याचे काम तसेच बेपत्ता व्यक्ती शोधण्याचे काम अतिशय गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. अनोळखी मृतदेह व त्याचे वारस शोधण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.**

नाहीत. अनोळखी मृतदेह सापडल्यावर तो शवविच्छेदन व शवागारात नेण्याची तसेच त्याची ओळख पटवण्यापासून तो वारसांना हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पोलिसच करत असतात. मृतदेहाचे वारस सापडावेत व त्यांची ओळख पटावी यासाठी मृतदेह ७ दिवस शवागारात ठेवला जातो. वारस सापडले नाही तर बेवारस समजून त्या मृतदेहावर अंत्यविधी करण्याचे कार्य पोलीस पार पाडतात.

मीरा-भाईंदर परिमंडळ १ मध्ये २०२२ ह्या वर्षात ५३ अनोळखी मृतदेह आढळले आहेत. त्यातील केवळ ८ मृतदेहांची ओळख पटली असून बाकीच्या ४९ मृतदेहांवर पोलिसांमार्फत अंत्य संस्कार करण्यात येत असतात. वसई पोलीस परिमंडळ २ मध्ये वर्षभरात ५५ अनोळखी मृतदेह सापडले. त्यापैकी ५३ मृतदेहांवर पोलिसांनी अंत्यसंस्कार केले आहेत. विरार पोलीस परिमंडळ ३ मध्ये सर्वात जास्त ७० अनोळखी मृतदेह गेल्यावर्षी आढळल. त्यातील ५६ अनोळखी मृतदेहांवर पोलिसांनी अंत्यविधी केला.

पूर्वी शासन वा पालिकेच्या शववाहिनी किंवा रुग्णवाहिका कमी असायच्या. त्यामुळे खाजगी रुग्णवाहिकांच्या चालकांना बोलवावे लागत असे. त्याचा खर्च सुद्धा पोलिसांनाच करावा लागायचा. मात्र कोरोनामुळे पालिका आणि शासनाच्या रुग्णवाहिका, शववाहिकांची संख्या वाढल्याने पोलीस त्याचाच वापर करत असल्याचे सांगितले जाते. अनोळखी मृतदेह सापडल्यानंतर त्याची ओळख पटवण्यापासून त्यांचे वारस शोधण्याचे काम सुद्धा मोठे जिकरीचे असते. त्यासाठी राज्य व देशपातळीवर समन्वय साधून माहिती उपलब्ध करून देणाऱ्या यंत्रणेची गरज जाणवत असल्याचे पोलिसांकडून सांगितले जात आहे.

नव शक्ति Fri, 20 January 2023
https://epaper.freepressjournal.in/c/71464275

CamScanner
CamScanner

RNI NO.: MAHHIN/2014/57057

MKM

# मजदूर की मुंबई

संपादक - राजेंद्र एच. शर्मा | कार्यकारी संपादक - अख्तर किरमानी

वर्ष : ०९ | अंक - २४ | मुंबई, १८ से २४ जनवरी २०२३ | उपसंपादक - विनोद मौरे | पृष्ठ - ४ | मूल्य : २ रुपये

# सरकारी जमीन पर कब्जा करनेवाले भूमाफियाओ पर गुन्हा दाखल करने की प्रक्रिया शुरू



श्रीमती उज्ज्वला भगत
तहसीलदार वसई तालुका



श्री. विलास सुपे
वरिष्ठ पुलिस निरीक्षक





पिछले शुक्रवार में आपने ने पढ़ा हो की वसई तहसिलदार श्रीमती उज्ज्वला भगत ने सरकारी जमीन पर कब्जा करने वाले भूमाफियाओं पर गुन्हा दाखल करने के आदेश दिए थे, उसी आदेश का पालन करते हुवे सूत्रों की जानकारी से पता चल है, की नालासोपारा पश्चिम के थाने के वरिष्ठ पुलिस निरीक्षक श्री विलास सुपे ने ५१०/अ/१ जमीन से जुड़े सभी भूमाफियाओं पर गुन्हा दाखल करने की प्रक्रिया शुरू कर दी है अब देखना यह होगा की किन किन धाराओं में इन भूमाफियाओं पर गुन्हा दाखल किया जाएगा, आपको बता दे पुलिस निरीक्षक श्री विलास सुपे साहेब काफी सख्त अधिकारी है, और इन्होंने अभी तक काफी ईमानदारी से काम किया है।

## गृहणी का बेटा बना डॉक्टर प्रतिकूल परिस्थितीयों में शिक्षा पुरी की



भायंदर : भायंदर में एक गृहिणी के बेटे सुजीत सोनकेकले ने डॉक्टर बनने के लिए विपरीत परिस्थितियों को पार कर लिया है सात ही में रिजल्ट आया है और उन्होंने बैंगलोर से फिजियोथेरेपी में डिग्री ली है झुग्गी में रहने वाले सुजीत ने जन शिक्षा के स्कूल में और बाद में छात्रवृत्ति की मदद से अपनी शिक्षा पूरी की सुजीत सोनकेकले, एक युवक, भायंदर में एक पहाड़ी झुग्गी में आर्थिक रूप से कमजोर तबके में रहता है उनकी मां शैला सोनकेकले हाउसकीपिंग का काम करती हैं जबकि उनके पिता मामूली काम करते हैं। सुजीत तीन भाइयों और बहन वालों सहित आठ भाई-बहनों के एक बड़े परिवार में पले-बढ़े चूंकि सुजीत बचपन से पढ़ाई में होशियारी थे, इसलिए उनकी मां ने उन्हें आगे की शिक्षा देने की ठानी पिता और बड़ी बहनों से मिले मामूली पैसों से उन्होंने 12वीं तक की पढ़ाई पूरी की। सुजीत पहले एमबीबीएस डॉक्टर बनना चाहते थे इसके लिए उन्होंने नीट की परीक्षा भी दी जिसमें एक साल की असफलता के बाद वे अच्छे अंकों से उत्तीर्ण हुए लेकिन आर्थिक स्थिति के कारण उन्होंने एमबीबीएस की पढ़ाई नहीं कर सके इसलिए उन्होंने स्कॉलरशिप पाकर बैंगलोर के एक मेडिकल स्कूल में फिजियोथेरेपी कोर्स में दाखिला ले लिया। पांच साल तक कठिन परिस्थितियों का सामना करने के बाद आखिरकार उन्होंने अच्छे अंकों के साथ डॉक्टरेट की उपाधि प्राप्त की सुजीत ने कहा कि उन्होंने अपनी उच्च डिग्री के लिए पढ़ाई शुरू कर दी है और भविष्य में वह गरीब नागरिकों की सेवा के लिए अपना क्लीनिक खोलेंगे, उनकी मां ने संतोष जताया है कि बेटे का डॉक्टर बनने का सपना पूरा हो गया है. अपने परिवार की मेहनत और प्रोत्साहन की वजह से मैं इतना पढ़ पाया इसलिए सुजीत ने कहा कि वह समाज के गरीब नागरिकों की सेवा कर अन्य बच्चों को प्रोत्साहित करने का काम करेंगे।

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी की जनजागर यात्रा को मीरा-भाईंदर शहर मे मिला भरपूर प्रतिसाद





खास प्रतिनिधी (मनोज के. वाघमारे) : राष्ट्रवादी महिला काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश द्वारा आयोजित जनजागर यात्रा को पूरे महाराष्ट्र में भरपूर प्रतिसाद मिल रहा है व यात्रा का नियोजन काफी उत्साहपूर्वक किया जा रहा है, जिसका अगवाही महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा विद्याताई चव्हाण इनकी प्रमुख उपस्थिती व श्री. जितेंद्र आव्हाड साहेब इनके मार्गदर्शन में दिनांक 16/01/2023 के दिन मीरा-भाईंदर सुभाषचंद्र पार्क, भाईंदर वेस्ट, मिरा रोड शांतिनगर, नवघर गांव, इन स्थानों पर जनजागर यात्रा आयोजित की गयी थी इस यात्रा में प्रदेश, जिल्हा, तालुका, प्रांत सेल, वॉर्ड, प्रभाग के सभी पदाधिकारी व कार्यकर्ता की प्रमुख उपस्थिती थी

## महाराष्ट्र के ठाणे में MSEDCL का इंजीनियर रिश्वत लेते हुए गिरफ्तार, एंटी करप्शन ब्यूरो की कार्रवाई

ठाणे : भ्रष्टाचार निरोधक ब्यूरो ने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) के एक अतिरिक्त कार्यकारी अभियंता को मीटर टेस्टिंग करने वाली एक फर्म के लिए कथित तौर पर प्रोत्साहक टिप्पणी करने और अन्य काम करवाने के लिए 15,000 रुपये की रिश्वत लेने के आरोप में गिरफ्तार किया है एसीबी ने बुधवार को यह जानकारी दी। फर्म ने मीटर टेस्टिंग, बिलों के भुगतान और वितरण का काम किया था और सभी कामों को भुगतान के लिए कार्यकारी अभियंता को भेजा था भ्रष्टाचार निरोधक ब्यूरो द्वारा जारी एक प्रेस विज्ञप्ति में कहा गया है कि फर्म द्वारा एमएसईडीसीएल के उप-मंडल कार्यालय में पिछले 47 बिलों आरोपी ने भुगतान के बदले जमा किए गए बिलों पर प्रोत्साहक टिप्पणी करने के लिए उस फर्म के साथ काम करने वाले एक व्यक्ति से कथित तौर पर 20,000 रुपये की मांग की थी लेकिन बाद में आरोपी ने 15 हजार रुपये में सौदा तय किया। फर्म के कर्मचारी द्वारा एसीबी को लिखित शिकायत मिलने के बाद भ्रष्टाचार निरोधक ब्यूरो ने उसे पकड़ने के लिए जाल बिछाया और आरोपी इंजीनियर को शिकायतकर्ता से पैसे लेते हुए रंगे हाथ गिरफ्तार कर लिया। एसीबी ने बताया कि आरोपी अभियंता के खिलाफ भ्रष्टाचार निरोधक कानून की संबंधित धाराओं के तहत मामला दर्ज किया गया है।

CS CamScanner